<u>नि.दिवाणी दावा क्रं.३६/२०१५</u>
<u>नि. क्रं.१०४ लगत.</u>

<u>:: वादी पक्षातर्फे विधीज्ञ श्री. जी.एस. बिरादार यांनी पुढील सरतपास घ्यायचे नाही असे सांगितल्याने सरतपास बंद.</u>

<u>:: प्रतिवादी क्र.९ करिता विधीज्ञ श्री. बी. व्ही. पाटील यांच्यामार्फत शपथेवर उलटतपास सुरु. ::</u>

माझे शिक्षण ७ वी पर्यंत झाले. मी फक्त शेती करतो. माझे घर शाळेजवळ आहे. त्यानंतर पंधरा–वीस घराच्या अंतरावर नागशेट्टी बिरादार यांचे घर आहे. मी वादी आणि प्रतिवादी यांच्या भावकीतील व्यक्ती आहे. वादीला बहिण सोजरबाई आणि भाऊ बाबुराव, बालाजी, योगेश आहेत. बालाजी आणि योगेश मयत आहेत व बाबुराव हयात आहेत. बालाजीला पत्नी आहे. तिचे नाव विजयमाला आहे. बालाजीला एक मुलगी आहे. नागशेट्टी बिरादारचे जुने घर गावामध्ये आहे. ते पडलेल्या स्थितीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, बालाजी, योगेश आणि बाबुराव यांनी वर्ष १९९७ मध्ये वाटणी करून घेतली आणि उदगीर येथील न्यायालयामध्ये त्याअनुषंगाने हुकूमनामा घेतला. हे म्हणणे खरे नाही की, वादी क्र.१ व २ यांनी सदर वाटणीमध्ये त्यांचा हिस्सा भावांना वर्ग केला होता.

०२. वाद जमिनीचा सर्वे क्र.४१ आहे. त्यामधील सर्व जमीन

बाबुरावच्या नावे आहे. मी सदर जमिनीचा ७/१२ उतारा बघितला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये संपूर्ण मजकूर खोटा कथन केला. हे म्हणणे खरे नाही की, मी वादी वंदनाच्या सांगण्यावरून खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण

**:: प्रतिवादी क्र.१ ते ८ आणि त्यांचे अधिवक्ता गैरहजर आहेत. त्यांनी साक्षीदाराचा उलटतपास घेण्यास कसूर केला. प्रकरण जुने आहे. तहकूब करण्यासाठी पुरेसे कारण नाही. सबब उलटतपास नाही. ::**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.

( श.अ. सुरजुसे )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.

दि. १२/१२/२०२५.